महाराष्ट्र शासन
शासकीय परिचर्या महाविद्यालय ,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, JALGAON
Jilhapeth, Government Hospital Campus, Jalgaon- 425 001, M.S. (INDIA)
Telephone & Fax No. 0257- 2232390 Email- govtnursingcollegejalgaon23@gmail.com

जा.क्र.शापमज/B.Sc.नर्सिंग / / /२०२६ दि. / /२०२६

## ANNEXURE- III

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
**Following documents need to available on web site**

***Trust Deed / Bylaws/ Registration Certificate (Trust / Hospital (Bombay Nursing Act))***
**Faculty : Nursing**

**Name of College/Institute : Government Nursing College , Jalgaon**

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | | |
| Registration Certificate **To be uploaded on web site clear and original copy** | | Trust / Society :- **To b e uploaded on web site** |
| | | Trust Deed / Bylaws:- **To be uploaded on web site** |
| | | Hospital Ownership Documents:- |
| | | Hospital (Bombay Nursing Act) :- **To be uploaded on web site** |
| | | MPCB Certificate of Parent Hospital :- **To be uploaded on web site** |
| Hospital Type as Per Bombay Nursing Act :- **Government Medical College & Hospital,** Scondary **& Territory care** | | |
| Hospital (Bombay Nursing Act) issuing Authority :- Municipal Corporation Jalgaon. | | |
| Hospital Bed as per Certificate:- 565 | | |
| Name of the College / Institute (As per First Affiliation letter) | : | **Government Nursing College , Jalgaon** |
| Address | : | Jilhapeth, Government Hospital Campus, Jalgaon- 425 001 |
| Email ID | : | govtnursingcollegejalgaon23@gmail.com |
| Telephone / Mobile No.(s) | : | 8446927976 |
| Website | : | www.deangmcjalgaon. Org |
| College Code | : | 153156 |

**Here by I declare all relevant document uploaded are clear and visible on web site & are true as per my best knowledge**

**Any Other, Please Specify:-**

PRINCIPAL
GOVT.NURSING COLLEGE
G.M.C.,JALGAON

रक्तदान जीवनदान

महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

Government Medical College & Hospital, Jalgaon

Jilhapeth, Government Hospital Campus, Jalgaon- 425 001, M.S. (INDIA)

Telephone & Fax No. 0257- 2232390

Email- deangmcjalgaon@gmail.com

जा.क्र.शावैमवरुज/आस्था -नर्सिंग /शुश्रुषा महाविद्यालय /२०२५ १६९६ दि:२८/०४/२०२५

## Public Trust Act १९५० नोंदणी प्रमाणपत्र

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जळगाव हे शासकीय रुग्णालय आहे शासकीय रुग्णालय Public Trust Act १९५० च्या अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र असण्याची अट लागु नाही. त्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जळगाव अंतर्गत नव्याने सुरु होणा-या बि. एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या परिचर्या महाविद्यालयाकरिता Public Trust Act १९५० अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची अट लागु नाही असे प्रमाणित करण्यात येत आहे.

28/04

(डॉ. गिरीष ठाकुर)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्याल व रुग्णालय,
जळगांव.

PRINCIPAL
GOVT.NURSING COLLEGE
G.M.C.,JALGAON

रक्तदान जीवनदान

महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

Government Medical College & Hospital, Jalgaon

Jilhapeth, Government Hospital Campus, Jalgaon- 425 001, M.S. (INDIA)

Telephone & Fax No. 0257- 2232390

Email- deangmcjalgaon@gmail.com

जा.क्र.शावैमवरुज/आस्था -नर्सिंग /शुश्रुषा महाविद्यालय /२०२५ १६९६ दि:२८/०४/२०२५

Public Trust Act १९५० नोंदणी प्रमाणपत्र

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जळगाव हे शासकीय रुग्णालय आहे शासकीय रुग्णालय Public Trust Act १९५० च्या अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र असण्याची अट लागु नाही. त्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जळगाव अंतर्गत नव्याने सुरु होणा-या बि. एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या परिचर्या महाविद्यालयाकरिता Public Trust Act १९५० अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची अट लागु नाही असे प्रमाणित करण्यात येत आहे.

28/04

(डॉ. गिरीष ठाकुर)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्याल व रुग्णालय,
जळगांव.

PRINCIPAL
GOVT. NURSING COLLEGE
G.M.C., JALGAON.

# MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

# जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

सन १९४९ च्या दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्टच्या कलम ५ अन्वये दिलेले रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट (नियम ५ अन्वये)

**Certificate of Registration under Section 5 of the Bombay Nursing Homes Registration Act, 1949 (Under Rule 5)**

क्रमांक No. :

दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ अन्वये श्री./श्रीमती डॉ. सुजीत भोसले सामान्य रुग्णालय यांचे जिल्हा पेठ, जळगांव येथील नर्सिंग होम / मॅटर्निटी होम रजिस्टर केले असून सदरचे नर्सिंग होम व मॅटर्निटी होम चालविण्यास परवाना देण्यात येत आहे.

This is to certify that Shri. / Shrimati __________ has been registered under the Bombay Nursing Homes Registration Act, 1949 in respect of __________ situated at __________ and has been authorised to carry on the said Nursing Home.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रजिस्ट्रेशन क्र. : | ३६४ | प्रसुतीसाठी | ४६५ | कॉटस् |
| Registration No. | — | Maternity | — | Cots |
| रजिस्ट्रेशन दि. : | ९/८/२०१८ | इतर रुग्णांसाठी | १०० | कॉटस् |
| Date of Registration | — | Other Nursing Patients | — | Cots |

ठिकाण : जळगांव

सर्टिफिकेट दिल्याचा दिनांक / Date of Issue of Certificate :

सदरचे सर्टिफिकेट दिनांक ~~३१ मार्च~~ ९/८/२०१८ ३१/३/२०१९ पर्यंत कार्यवाहीत राहील.

This Certificate shall be valid up to 31st March __________

आरोग्याधिकारी

आरोग्य प्रमुख, जळगाव शहर महानगरपालिका

Medical officer of Health,

Municipal Corporation of the City of Jalgaon.

PRINCIPAL

GOVT. NURSING COLLEGE

G.M.C., JALGAON

Scanned with CamScanner

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

ONE HUNDRED RUPEES

रु. 100

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

2015

NH 08954

29 MAR 2016

[illegible]

करारनामा

करारनामा लिहून देणार - मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली. जळगांव
हिरापन्ना अपार्टमेंट, १ ला माळा, पांडे चौक, जळगांव
जिल्हा जळगांव.

CIVIL HOSPITAL JALGAON

करारनामा लिहून घेणार - जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, जळगांव.

Jalgaon

सामान्य रूग्णालय, जळगांव व अंतर्गत कार्यरत असणाऱ्या उपजिल्हा तसेच ग्रामीण रूग्णालयातील टाकाऊ जैविक वैद्यकिय कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी

PRINCIPAL
GOVT. NURSING COLLEGE
G.M.C. JALGAON

महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार रूग्णालयातील जैविक वैद्यकिय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली.जळगांव यांचेकडून सदर करार करण्यात आलेला आहे. जिल्हा रूग्णालयात एकूण ४७२ बेड ( खाटा ) आहेत तसेच उपजिल्हा रूग्णालय चोपडा येथे १०० बेड , तसेच उपजिल्हा रूग्णालय जामनेर व मुक्ताईनगर येथे प्रत्येकी ५० बेड , व उर्वरीत सर्व ग्रामीण रूग्णालये प्रत्येकी ३० बेड असे एकूण ११८२ बेड ( खाटा ) हे आज रोजी उपलब्ध असुन यात प्रति बेड / प्रति दिवस रूपये - ६.६५ पैसे या दराने टाकाऊ जैविक वैद्यकिय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी दर आकारणी केली जाईल. तसेच करार झाल्यापासून दरवर्षी १० टक्के दरवाढ केली जाईल.

मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली.जळगांव आणि जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रूग्णालय , जळगांव यांचे मध्ये आज दिनांक ०७ / ०४ / २०१६ रोजी करारनामा करण्यात येत आहे.

खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून हा करारनामा राजीखुशीने करून देण्यात येत आहे. सामान्य रूग्णालय जळगांव , तसेच उपजिल्हा व ग्रामीण रूग्णालये येथील जैविक वैद्यकिय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट करतांना खालील अटी व शर्तीचें पालन करण्यास तयार आहोत.

१) सदर करार अमलात आल्याचे दिनांकपासून एम पी सी बी च्या निदर्शनानुसार जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीनें विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली. जळगांव यांची राहील .

२) सदर जैविक कचरा हा कंपनीने रूग्णालयातुन नेल्यानंतर एम पी सी बी च्या निर्देशाच्या वेळेत ( ४८ तास ) शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

३) भविष्यात जर एम पी सी बी ( महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ , मुंबई / महाराष्ट्र राज्य ) ने काही नविन नियम लागू केल्यास त्या नियमानुसार कंपनीला जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.

४) मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली. जळगांव यांच्या जैविक कचरा शास्त्रोक्त पद्धतीने एम पी सी बी च्या नियमानुसार वेळेत होते आहे किंवा नाही यांची पडताळणी जिल्हा शल्य चिकित्सक , अति जिल्हा शल्य चिकित्सक , निवासी वैद्यकिय अधिकारी ( चि. ) निवासी वैद्यकिय अधिकारी ( बां.रु ) , वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी ही कोणत्याही वेळेस येउन पाहणी करतील. कामकाज असमाधानकारक आढळल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल .

५) या जिल्हा रूग्णालया अंतर्गत कार्यरत उपजिल्हा रूग्णालये ( ३ ) व ग्रामीण रूग्णालये ( १७ ) यांची संपूर्ण जैविक वैद्यकिय कचरा शास्त्रोक्त पद्धतीने वाहतूक करून शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करणे बाबत जबाबदारी आपली राहील .

६) तसेच कंपनीने विविध प्रकारचा जैविक वैद्यकिय कचरा वाहतूक करून उचलून नष्ट करण्याचा संपुर्ण अहवाल या कार्यालयास व सर्व संबधीत वरीष्ठांना सादर करणे बंधनकारक राहील .

PRINCIPAL
GOVT. NURSING COLLEGE
G.M.C., JALGAON

७) मासिक देयके हे उचललेल्या व नष्ट केलेल्या जैविक वैद्यकिय कचऱ्याच्या मासिक अहवालानुसार या कार्यालयातून उपलब्ध अनुदानातून वेळेत अदा केले जातील.

८) रूग्णालयातून जैविक वैद्यकिय कचरा वाहतूक करतांना एम पी सी बी ने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार जैविक वैद्यकिय कचरा वाहणे बंधनकारक राहील.

९) रूग्णालयाने एम पी सी बी च्या सुचनेनुसार जैविक वैद्यकिय कचरा हा लाल व पिवळ्या रंगाच्या पिशवीत वेगवेगळा करून टाकणे बंधनकारक राहील.

१०) तसेच करार झाल्याचे तारखेपासुन हा करारनामा या पुढील (१५) पंधरा वर्षासाठी लागु राहील.

११) सर्व अटी व शर्ती शासन निर्णयानुसार तसेच न्यायालयीन मार्गदर्शक सुचना किंवा निर्णय वेळोवेळी होणारे बदल हे बंधनकारक राहतील.

वरील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य असून त्या आम्हावर बंधनकारक आहेत.

ठिकाण :- जळगांव

दिनांक :- ०७/०४/२०१६

करारनामा लिहून घेणार

जिल्हा शल्य चिकित्सक,
CIVIL SURGEON, JALGAON
सामान्य रूग्णालय, जळगांव

CIVIL HOSPITAL
सत्यमेव जयते
JALGAON

करारनामा लिहून देणार

मनसाई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस
Mansai Biomedical Waste Ent. Pvt. Ltd.
प्रा. ली. जळगांव

साक्षीदार

१)
सही :- 
नाव :- Pankaj M. Hadchate

२)
सही :- 
नाव :- Ravindra W. Dongre



PRINCIPAL
GOVT. NURSING COLLEGE
G.M.C., JALGAON

# Mansai Biomedical Waste Enterprise Pvt Ltd

Dist. Jalgaon 425001

Emergency Mobile No.



Unique Registration No.

Official QR Code

## Registration Certificate

Online QR Code

*Outward No.: MBWE 2024 0185* *Date: 04-12-2024*

*This is to certify that, Government Medical College And Hospital, at Dikshit Wadi, Jilhapeth, Jalgaon, Maharashtra 425001 is registered with M/s. Mansai Biomedical Waste Enterprise Pvt Ltd Jalgaon for Management of Bio Medical Waste in accordance with, the provision of Bio Medical Waste Management Rules, 2016, as amended and in compliance with the provisions of CPCB guidelines.*

1 **Authorized Person of HCE (Name and Designation)** : **Dr. Girish Thakur**, Dean

2 **Bombay Nursing Home Act Registration Details**

a. BNH Registration Number : Not Applicable
b. BNH Issue Date : 04-12-2024
c. Total Number of Beds : 456 Beds
d. BNH Validity (Form 'C') : 04-12-2024

3 **Common Treatment Facility Registration Details**

a. Date of Registration : 01-09-2017
b. No. of Beds Registered : 456 Beds
c. Registration Validity : 31-03-2025

4 **Renewal of CTF Membership (if Applicable)**

a. Renewal Date : 01-04-2025
b. No. of Beds : 456 Beds

5 **MPCB Consent (Establish/ 1st Operate/ Renewal) Details**

a. Consent / CCA Number : Not Applicable
b. Issue Date : 04-12-2024
c. Validity up to : 04-12-2024

Mansai Biomedical Waste Enterprises Pvt. Ltd. Jalgaon

Authorized Signature

**Name** : Rajiv Mahajan
**Designation** : Director

Note: *HCE shall display copy of Registration Certificate at Front Desk and Temporary BMW Storage area.*

PRINCIPAL
GOVT. NURSING COLLEGE
G.M.C., JALGAON

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2023 © CN 979616

जिल्हा कोषागार ... प्रमाणित करण्यात आलेला आहे

- 5 AUG 2024

... प्रमुख लिपीक जळगांव

हा सामंजस्य करार जिल्हाशल्यचिकित्सक,जिल्हा सामान्य रुग्णालय,जळगांव(पक्ष अ)आणि अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,जळगांव (पक्ष ब) या दोघांमध्ये आज दि. 23 / 08 /2024 रोजी खालील संदर्भाकित शासन निर्णयानुसार करण्यांत आला.

३. दोन्ही पक्ष खालील प्रमाणे सामंजस्य करार करण्यात शासनातर्फे नियुक्त केलेले आहेत व सक्षम आहेत.

४. खालील संदर्भाकित शासन निर्णयानुसार पक्ष अ यांचेकडून पक्ष ब यांना नमुद केलेल्या इमारती चल व अचल संपत्ती सोबत खालील अटी व शर्तीनुसार हस्तांतरीत करण्यास तयार आहेत. म्हणून खालील प्रमाणे सामंजस्य करार करण्यांत येत आहे.

PRINCIPAL
GOVT. NURSING COLLEGE
G.M.C. JAL...



230

## सामंजस्य करार

विषय-आरोग्य सेवा संचालनलायाच्या अधिपत्याखालील जिल्हा सामान्य रुग्णालय,जळगांव व त्या सह 12 एकर जागा वैद्यकीय शिक्षण व संशोधन,संचालनलायाकडे पुर्णत: हस्तांतरीत करणेबाबत.

संदर्भ- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई यांचा शासन निर्णय क्रं.एमईडी २०१७/प्र.क्र.205/17/ शिक्षण-1, दिनांक 29 सप्टेंबर,2017

वरील संदर्भीत शासन निण्रयानुसार आरोग्य सेवा संचालनलायाच्या अधिपत्याखालील जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव व त्या सह १२ एकर जागा जळगांव येथील नियोजीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे हस्तांतरित करण्यांत आलेली आहे.

वरील संदर्भीय शासन निर्णयास अनुसरुन सदर हस्तांतरणाबाबत संचालक, आरोग्य सेवा व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या मध्ये खालील प्रमाणे सामंजस्य करार करण्यांत येत आहे.

१. जिल्हा रुग्णालय व रुग्णालयाच्या परिसराची सर्व जागा हि जरी हस्तांतरीत झाली तरी इमारत व जागेचा ताबा हे जिल्हाशल्यचिकित्सक यांचे नावावरच राहिल. त्यात कोणताही बदल होणार नाही.

२. जिल्हाशल्यचिकित्सक, हे तेथील नवनियुक्त अधिष्ठाता यांचे बरोबर करार करतील व सदर करार हा फक्त ३ वर्षाच्या कालावधीकरीता असेल. त्यानंतर तो आपोआप संपुष्टात येईल.

३. रुग्णालय इमारतीमधील सुमारे ५,००० चौ.फुट जागा हि जिल्हाशल्यचिकित्सक कार्यालय, प्रशासकीय कार्यालय इत्यादीसाठी व ५,००० चौ.फुट जागा औषधभांडार यासाठी अशी एकुण १०,००० चौ.फुट क्षेत्र सार्वजनिक आरोग्य विभागाकडेच ठेवण्यांत येईल. जिल्हाशल्यचिकित्सक त्यांच्या पसंतीने (सोईनुसार)या दोन कारणांसाठी जागेची निवड करतील. रुग्णालय इमारतीमधील व परिसरातील उर्वरित जागा करार चालु असे पर्यन्त अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली राहील.

४. अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांना इमारतीच्या मुळ रचनेत काही फेरफार करावयाचे असतील तर त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाची (प्रशासनीक विभाग) यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील आवश्यकतेनुसार भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या परवानगीसाठी त्यांच्या मानकांप्रमाणे रुग्णालय इमारतीमध्ये फेरबदल करणे आवश्यक असल्यास जिल्हाशल्यचिकित्सक, यांचे मार्फत शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन तसा प्रस्ताव शासनास सादर केला जाईल व शासनाची परवानगी प्राप्त झाल्या नंतरच फेरबदल केले जातील.

५. सध्या जिल्हाशल्यचिकित्सक यांचे कार्यालयाचा आहरण व संवितरण अधिकारी हा जिल्हाशल्यचिकित्सक यांच्या अधिनस्त सार्वजनिक आरोग्य विभागाकडेच राहील. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने त्यांचेसाठी स्वतंत्र आहरण व संवितरण अधिकारी नियुक्त करावा. जिल्हा शल्यचिकित्सक यांचा आहरण व संवितरण

PRINCIPAL
GOVT.NURSING COLLEGE
G.M.C.,JALGAON

अधिकारी हा जिल्हाशल्यचिकित्सक यांच्या अख्यारीत असणा-या अधिकारी व कर्मचा-यांच्या आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहील. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे नियुक्त केलेला आहरण व संवितरण अधिकारी हा जिल्हाशल्यचिकित्सक यांचा जो अधिकारी व कर्मचारी वर्ग वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे प्रतिनियुक्तीने कार्यरत असेल त्यांचा आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन काम पाहील.

६. नेत्र विभाग व फिरते नेत्र पथक (मोबाईल ऑप्थॅल्मीक युनिट)हे पुर्वीप्रमाणेच जिल्हाशल्यचिकित्सक यांचे अख्यारीत राहील. त्याचे हस्तांतरण होणार नाही. अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांप्रमाणे स्वतंत्र नेत्र-चिकित्साशास्त्र विभाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचेकडे राहिल व स्वत: अधिष्ठाता यांच्या नियंत्राणाखाली काम पाहतील. जिल्हाशल्यचिकित्सक यांच्या अंतर्गत असणारे नेत्र विभाग व फिरते नेत्र पथक व अधिष्ठाता यांच्यांतर्गत असणारा नेत्र शल्यचिकित्साशास्त्र विभाग राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम हे समन्वयाने राबवतील.

७. अपगंत्व तपासणी मंडळ,गट-अ व गट-ब अधिका-यांसाठीची वैद्यकीय मंडळे ही पुर्वीप्रमाणेच जिल्हाशल्यचिकित्सक यांच्या अखत्यारीत राहतील जिल्हाशल्यचिकित्सक यांनी गट-क व गट-ड कर्मचा-यांसाठी वैद्यकीय प्रमाणपत्र देतांना विशेषतज्ञांच्या अभिप्रायाची आवश्यकता भासल्यास अधिष्ठाता यांच्या अधिपत्याखालील नेत्ररोग शल्यचिकित्साशास्त्र,अस्थिव्यंगोपचारशास्त्र,नाक,कान व घसाशास्त्र, औषधी वैद्यकशास्त्र, मानसोपचारशास्त्र इत्यादी विभागातील तज्ञ व त्यांना तांत्रिक तज्ञ अभिप्राय मागणीप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध करुन देतील.

८. सर्व कायदेशीर बाबीसाठी उदा. Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques (PCPNDT), Medical Termination of Pregnancy (MTP), Family Planning, Medical Negligence, Epidemic act व इतर तत्सम समित्यांसाठी जिल्हा समुच्चित प्राधिकारी हे जिल्हाशल्यचिकित्सक राहतील.

९. अतिरिक्त जिल्हाशल्यचिकित्सक हे प्रतिनियुक्तीने अधिष्ठाता यांचे प्रशासकीय नियंत्रणाखाली वैद्यकीय अधिक्षक म्हणुन रुग्णालयाचे कामकाज पाहतील.

१०. नविन वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने वैद्यकीय महाविद्यालयासाठी नव्याने लेखाशिर्ष व त्याखाली निधी उपलब्ध होईपर्यन्त स्वतंत्ररित्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने निधी उपलब्ध करुन द्यावा.

११. सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यामध्ये आसी सामंजस्य करारनामा झाल्यानंतर सुरक्षा,स्वच्छता, वस्त्रधुलाई, आहार या सेवा वैद्यकीय महाविद्यालयामार्फेत सुरु करण्यात याव्यात. सद्या रुग्णालयात उपलब्ध असलेल्या अवैद्यकीय सेवा चालुच ठेवण्याबाबत अधिष्ठाता निर्णय घेतील. अवैद्यकीय सेवा चालु ठेवायच्या असतील तर त्यांचे नियंत्रण व देयके यांची जबाबदारी अधिष्ठाता यांची राहील.

१२. सदरहू रुग्णालयातील उपलब्ध यंत्रासामुग्री व जडवस्तुसंग्रह आहे त्या स्थितीत वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांना वर्ग करण्यात येईल. यापुढे त्यावरील दुरुस्ती व देखभालीचा खर्च संबधित वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांनी त्यांचे निधीतून भागवावा या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाला या निधीची मागणी करता येणार नाही.

PRINCIPAL
GOVT. NURSING COLLEGE
G.M.C. JALGAON

232

१३. स्पेशल न्युबॉर्न केअर युनिट, डायलेसीस आणि डी.आय.सी.ई. हे राष्टीय आरोग्य अभियानांतर्गत असल्याने या सुविधांसाठीचा नियमित तांत्रिक कर्मचारी वर्ग वैद्यकीय महाविद्यालयाचा असेल तर प्रशासकीय नियंत्रण जिल्हाशल्यचिकित्सक यांचे राहील.

१४. हस्तांतरणाच्या दिवशी जिल्हा रुग्णालयात उपलब्ध असलेला औषधांचा साठा हा वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येईल व रुग्णालय हस्तांतरीत झाल्यानंतर रुग्णालयातील औषधी व कंझ्युमेबल्स उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाची राहिल.

१५. गट-अ मधील एम.बी.बी.एस. अर्हताप्राप्त वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा वैद्यकीय महाविद्यालयाकडे नियमानुसार प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यांत येतील व ते रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार अपघात विभाग वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून काम पाहतील.

१६. आपसी सामंजस्य करारनामा झाल्याच्या दिनांकापासून रुग्णालयामध्ये सद्या कार्यरत असलेले सर्व गट-अ/ब संवर्गातील विशेषज्ञ यांच्या सेवा प्रतिनियुक्ती कालावधी संपुष्टात आल्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाकडे परत करण्यांत येतील. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने प्रस्तावित महाविद्यालय व रुग्णालयातील विशेषज्ञांच्या सेवा त्यांच्याकडे इतर वैद्यकीय महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या विशेषज्ञांमधुन उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

१७. गट-क व गट-ड कर्मचारी यांच्या सेवा अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय यांच्याकडे प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यांत येतील. सदरची गट-क व गट-ड कर्मचा-यांची आस्थापना (प्रतिनियुक्तीच्या कालावधीत) रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी/ मुख्य प्रशासकीय अधिकारी यांच्या थेट नियंत्राणाखाली तसेच अप्रत्यक्षपणे अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली येतील.

१८. जिल्हायातील आरोग्य व्यवस्था सांभाळण्यासाठी जिल्हा मुख्यालयी जिल्हाशल्यचिकित्सक यांच्या अधिनस्त कार्यालयाकरीता आवश्यक पदांचा तपशील प्रपत्र अ येथे सादर केला असुन तो वैद्यकीय शिक्षण विभागास हस्तांतरीत करण्यांत येणार नाही.

१९. वैद्यकीय शिक्षण विभागास हस्तांतरित करावयाच्या पदांचा तपशील प्रपत्र ब मध्ये सादर केला आहे.

२०. शासन निर्णय दि.26.06.2014 मधील प्रपत्र अ मध्ये दर्शविलेले कर्मचारी जिल्हयातील आरोग्य व्यवस्था सांभाळण्यासाठी जिल्हा मुख्यालय जिल्हाशल्यचिकित्सक कार्यालयाकरीता राहतील. या कर्मचा-यांना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास प्रतिनियुक्ती देता येणार नाही.

२१. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध शासकीय योजनेतंर्गत कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांची सर्व पदे हे पुर्वीप्रमाणेच जिल्हाशल्यचिकित्सक यांचेकडे राहतील.

२२. सामंजस्य करारानंतर जिल्हाशल्यचिकित्सक व नियुक्त अधिष्ठाता हे आपआपसात करार करतील.

जिल्हाशल्यचिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय,जळगांव.

PRINCIPAL
GOVT.NURSING COLLEGE
G.M.C.,JALGAON

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय,जळगांव.

233